महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. ६१२ /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र, पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक २०/०८/२०१८

## विशेष वार्तापत्र

## फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेचा प्रतिसाद वाढला शेतीच्या हंगामातही फिरत्या पोलीस स्टेशनला जनतेची उपस्थिती

**भंडारा:–** जिल्हयात मा. पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात दिनांक १७/११/२०१८ रोजी जिल्हयात ठिकठिकाणी फिरते पोलीस स्टेशन कॅम्प लावण्यात आले होते. यामध्ये पोलीस स्टेशन आंधगाव अंतर्गत ग्राम पांढराबोडी येथे फिरते पोलीस स्टेशन चे आयोजन करण्यात आले. ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक सोनटक्के व ३ कर्म हजर होते. फिरते पोलीस स्टेशन दरम्यान २ तक्रारी प्राप्त झाले. त्यापैकी रोडवर बैलबंडी ठेवुन अतिक्रमण केल्याबाबत अर्जदार– १) अर्जदार–पांडुरंग तिमाजी बशिने रा. पांढराबोडी यांनी गैरअर्जदार– भाष्कर ग्यानीराम बशिने रा. पांढराबोडी यांचे विरुध्द तक्रार नोंदविली. त्याचप्रमाणे दुसरी तक्रार अर्जदार– २) जयलाल गुणाजी मेश्राम वय ३७ वर्ष रा. पांढराबोडी यांनी गैरअर्जदार– सतिश रविशंकर कुथे वय ३० वर्ष रा. पांढराबोडी घरासमोरील रस्त्यासंबंधात तक्रार नोंदविले असुन दोन्ही तक्रारीचे निपटारा करण्यात आले. व या दोन्ही तक्रार ग्रामपंचायतच्या संबंधात असल्याने दोन्ही तक्रारी ग्रामपंचाय कडे देण्यात आले. महिला विषयक कायदे, मोटार वाहण कायदे, बॅकींग फसवणुक, एटीएम फ्रॉड, ग्रामसुरक्षा, चोरी, घरफोडी, ध्वनीप्रदुषण, व्हॉट्सअप अफवा, अंधश्रध्दा निमुर्लन बाबत ध्वनी प्रदुषण बाबत माहीती देण्यात आली. तेथे ६० स्त्री, पुरुष उपस्थित होते. पोलीस स्टेशन पवनी अंतर्गत ग्राम निष्टी येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. त्यामध्ये पोस्टेचे पोलीस निरीक्षक चकाटे व ३ कर्म यांनी जनतेला वाहतुक नियमाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सायबर क्राईम, व्हॉट्सॲप, फेसबुक, आक्षेपार्य फोटो टाकु नये. याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. दखलपात्र व अदखलपात्र गुन्हयांची गुणात्मक विश्लेषण बाबत मार्गदर्शन केले. प्रतिसाद ॲप्स डाऊनलोड करणे विषयी माहीती दिली. यावेळी अर्जदार दिलीप नत्थु मरसकोल्हे वय ४८ वर्ष रा. निष्टी यांनी गैरअर्जदार तारुबाई सुकर वाढई रा. निष्टी यांचेविरूध्द अर्जदाराचे शेतीला लागुन असलेल्या जागेत अतिक्रमण केल्याची तक्रार केली होती. ती तक्रार प्रलबित आहे. अर्जदार विदया भिमराव वाढई यांनी गैरअर्जदार उत्तम रामदास खोब्रागडे रा. निष्टी यांचे विरुध्द तक्रार नोंदविली होती गैरअर्जदार यांनी अर्जदाराचे घरासमोर संडासचे पाईप घरासमोर लावले याबाबत झगडा व भांडण होते. तंटामुक्ती समितीच्या माध्यमातुन सदर तक्रार तेथेच सोडविण्यात आली यावर लगेच तातडीने तक्रार निवारण झाल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांनी समाधान व्यक्त केले. पोलीस स्टेशन पालांदुर अंतर्गत जेवनाळा येथे फिरते पोलीस स्टेशन उभारण्यात आले. महिलावंरील अत्याचारा बाबत मार्गदर्शन केले आहे गावात छोटे मोठे भांडन झाले तर ते तंटामुक्ती मध्ये सविस्तर मांडुन त्यांचा निकाल लावावा छोटीशी गोष्ट पोलीस स्टेशन मध्ये सांगन्यापेक्षा तंटामुक्तीमध्ये निराकरण करावे. त्यामध्ये स्त्री व पुरुष ९० उपस्थित होते. पोलीस स्टेशन लाखांदुर

अंतर्गत मेंढा फिरते पोलीस स्टेशन आयोजीत केले होते पो.स्टे. चे ठोणेदार पोलीस निरीक्षक मेश्राम व ३ कर्म यांनी गावातील लहान सहान तक्रारी विचारले, मोबाईल होणारे गुन्हयाबद्दल माहीती दिली. बॅक एटीएम पैश्याचे व्यवहार बाबत फसवणुक बाबत माहीती दिली. लोन देणे बाबत फसवणुक तसेच बालकांचे लैगिक कायदयाबाबत माहीती दिली. बॅकेचे पासबुक अकाउन्ट क्रमांक एटीएम क्रमांक कोणत्याही व्यक्तीस देवु नये. अंधश्रदेला बळी पडू नये. एखादया व्यक्तीला ताप आल्यास डॉक्टरकडे जावुन उपचार करावे. दिवाळी सनानिमीत्त लोक बाहेरगावी जातांना गावाला जातांना मौल्यवान वस्तु दागीने. घरी ठेवु नये बॅकेत ठेवावे गावात मंडई, नाटके, तमाशे आयोजीत केली त्यांची रितसर परवानगी तहसिल परवानगी तहसिल कार्यालय व पोलीस स्टेशन येथुन घ्यावी. संयोजकांनी ध्वनीक्षेपनाचा परवाना घेणे आवश्यक आहे. अशा सुचना व मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन करडी अंतर्गत ग्राम कन्हाळगाव येथे फिरते पोलीस स्टेशन आयोजीत केले होते. ठाणेदार कोयंडे व २ कर्म.नी ऑनलाईन फ्रॉड बाबत मार्गदर्शन केले अटक वारंट बाबत माहिती दिली पोलीस पाटील अल्पवईन मुलींना मार्गदर्शन केले. दारूबंदी बाबत मार्गदर्शन केले. पोलीस स्टेशन लाखनी अंतर्गत खेडेपार येथे फिरत्या पोलीस स्टेशनचे आयोजन करण्यात आले होते. मोबाईल फेसबुक बाबत माहिती दिली.बॅक एटिएम बाबत माहिती दिली महिलावंर होणारे अत्याचार बाबत माहिती दिली.व गावात शांतता कशी राखवी याबाबत माहिती दिली. त्यामध्ये महिलांवर होणारे अत्याचार बाबत मार्गदर्शन केले. एकुणच पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांच्या संकल्पनेतुन राबविण्यात येत असलेल्या फिरत्या पोलीस स्टेशन उपक्रमाचे फायदे जनतेच्या लक्षात येत असल्याने रोहणीचा व शेतातील ईतर महत्वाचे कामांचा हंगाम सुरू असुनही लोक मोठया प्रमाणावर फिरत्या पोलीस स्टेशनला हजर राहुन जनतेकडून मोठया प्रमाणावर हजर राहून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसुन येत आहे. लोक त्याचे तक्रारींचे निवारण करून घेत आहेत. तसेच पोलीसांकडुन मिळणा–या वेगवेगळया सुचनांची माहीती घेत आहेत. त्यामुळे पोलीस व जनता यांच्यामध्ये विश्वासाचे नाते निर्माण होत असुन जिल्हयामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधीत असल्याचे चित्र दिसत आहे. अधिकाधिक लोकांनी फिरते पोलीस स्टेशन उपक्रमात सहभागी होवुन आपल्या समस्या व तक्रारी सोडवुणुन घ्याव्यात विनाकारण न्यायालयापर्यंत नेवु नये आपल्या वेळेची व पैशाची बचत करावी व गावामध्ये शांततेचे व विकासाचे वातावरण निर्माण करावे असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती विनीता साहू यांनी जिल्हा वासीयांना केले.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता